सातारा जिल्हा परिषद सातारा

सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा परिषद मुख्य इमारत ४ था मजला, सातारा कोरेगाव रोड सदरबाजार,कॅम्प ता.जि.सातारा ४१५ ००१.

कार्यालय दुरध्वनी :- ०२१६२-२९५०५३ Email-dyceogadstr@gmail.com

जाक्र/आस्था१(१)/ताजेया/१५३५५३/२०२३ दि.०९/०५/२०२३

विषय :- परिचर संवर्गातील १० वी उत्तीर्ण कर्मचा-यांची तात्पुरती यादी २०२३ प्रसिध्द करणेबाबत.

**ज्ञापन,**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.आरटीआर-१०८५/८५२/प्र.क्र.७२-८५/तेरा/दि.१५/०४/१९९१ व वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण/२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१/दि.१४/०१/२०१६ व महाराष्ट्र शासन यांचेकडील ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण/५०१६/प्र.क्र.८७/आस्था-८/२०१६दि.०५/०५/२०१६ अन्वये लिपीक संवर्गात गट-ड कर्मचा-यांमधुन पदोन्नतीने भरावयाच्या पदांची मर्यादा संवर्गसंख्येच्या २५ टक्के वरून ५० टक्के पर्यंत वाढविणेबाबत सुचना आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने जिल्हा परिषद साताराकडील परिचर गट-ड संवर्गातील इ.१० वी उत्तीर्ण कर्मचा-यांची यादी तयार करणेत आलेली असून सदर यादी संबंधित कर्मचा-यांचे निदर्शनास आणणेची आहे.सदर यादीमध्ये वाहन चालक परवाना,तसेच पशुधन पर्यवेक्षक परीक्षा उत्तीर्ण,झालेले कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता नमूद केलेली नसलेस आवश्यक पुराव्यासह सदर अर्हता वाढविणेबाबत या कार्यालयाकडे कळविणेत यावे. सदर यादीमध्ये ज्या कर्मचा-यांचे नाव वगळले असलेस,माहितीमध्ये काही सुधारणा असलेस (नावात बदल,जन्मतारीख,शैक्षणिक अर्हता,इ.) अगर यादीबाबत काही आक्षेप/हरकती असलेस संबंधित कर्मचा-यांनी समक्ष लेखी पुराव्यासह या कार्यालयास दि.३०/०५/२०२३ अखेर आक्षेप/हरकती नोंदविणेचे असुन आक्षेप/हरकती विहीत मुदती नंतर प्राप्त झालेस सदर आक्षेप/हरकतीचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घेणेची आहे. तसेच सदरबाबत भविष्यात पदोन्नती प्रक्रियेदरम्यान जेष्ठतेबाबत एखाद्या कर्मचा-याने आक्षेप घेतल्यास सदरचा आक्षेप अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सदरची यादी संबंधित कर्मचा-यांचे निदर्शनास आणलेनंतर व कर्मचारी यांचा कोणताही आक्षेप/हरकत नसलेस संबंधित कर्मचा-यांकडुन लेखी घेणेची व या कार्यालयाकडे सदरची लेखी माहिती पुरविणेची जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुखांची राहिल.

सोबतः- परिचर संवर्गातील १० वी उत्तीर्ण कर्मचा-यांची यादी

(अर्चना वाघमळे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रति,

सर्व संबंधितांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.

प्रतः- सर्व खातेप्रमुख, जि प सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रतः- सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

२/- सदरची यादी सुलभ संदर्भाकरीता जिल्हा परिषदेकडील सर्व खातेप्रमुख व पंचायत स्तरावरील गट विकास अधिकारी यांचे ई-मेल वरती यादी पाठविणेत येत आहे.